अशोक कोर्टीकर, पंढरपूर.

□ **देशभक्तीची प्रेरणा देणारा पहिला मराठी व हिंदी चित्रपट कोणता?**

— १९३५चा प्रभातचा *धर्मात्मा*. या चित्रपटात संत एकनाथची भूमिका गांधीजींना डोळ्यासमोर ठेवून रंगवण्यात आली होती. सुरुवातीला या चित्रपटाचे नाव *महात्मा* ठेवण्यात आले होते. पण ब्रिटीश सरकारने या नावाला आक्षेप घेतला. यामुळे या चित्रपटाचे नामकरण नंतर *धर्मात्मा* करण्यात आले.

डी. जी. मानकुंवदे, पाचवड, जि. सातारा.

□ **गायिका अभिनेत्री स्वर्गीय नूरजहाँची जन्मतारीख कोणती? तिला मलिका-ए-तरन्नूम हा किताब कोणी दिला?**

— नूरजहाँची जन्मतारीख २९ सप्टेंबर १९२९. तिची भूमिका असलेला *जीनत* हा चित्रपट १९४५ साली पडद्यावर आला होता. आणि या चित्रपटाच्या यशाच्या निमित्ताने वेणी या गुजराती सिनेसाप्ताहिकाचे संपादक बदरी काचवाला यांच्यातर्फे मुंबईत तिचा सत्कार करण्यात आला होता. या सत्कार समारंभात वेणी साप्ताहिकाने मलिका-ए-तरन्नूम हा किताब तिला दिला.

डी. जी. मानकुंवदे, पाचवड, जि. सातारा.

□ ***सलोनी* (१९५२), *भाईसाहब* (१९५४), *पिया मिलन* (१९५८) या चित्रपटातील प्रमुख कलाकार कोण?**

— *सलोनी*चे प्रमुख कलाकारः अशोककुमार, नलिनी जयवंत, जयंत, मोहना, *भाईसाहेब*चे प्रमुख कलाकार सी. एच. आत्मा, पूर्णिमा, स्मृती विश्वास, जगदीप, रतनकुमार, केंवल. *पिया मिलन* तामिळीतून हिंदीत डब होऊन आलेला एक चित्रपट होता. वैजयंतीमाला, राजा सुलोचना, एम. एन. राजन, रिता श्रीराम हे या चित्रपटातील प्रमुख कलाकार होते.

रजत पवार, अहमदनगर.

□ ***नया रास्ता* हा चित्रपट कोणत्या वर्षी पडद्यावर आला होता? कलाकार गीतकार-संगीतकार, निर्माता-दिग्दर्शक कोण?**

— *नया रास्ता* या नावचे दोन चित्रपट आतापर्यंत आले आहेत. पहिला १९५१ला, दुसरा १९७०ला. १९५१च्या *नया रास्ता*चे प्रमुख कलाकार मनहर देसाई. निरुपा रॉय, आगा, कृष्णाकुमारी, बिपिन गुप्ता, संगीतकार चित्रगुप्त. निर्माता-दिग्दर्शक जयंत देसाई १९७०च्या *नया रास्ता*चे प्रमुख कलाकार जितेंद्र, आशा पारेख, बलराज साहनी, फरिदा जलाल, ललिता पवार, सुजीतकुमार.

राजेश कुलकर्णी, नागपूर.

□ ***पारसमणी* हा चित्रपट कधी प्रदर्शित झाला होता? कलाकार, गीतकार, संगीतकार, निर्माता-दिग्दर्शक कोण?**

— *पारसमणी* १९६३ला प्रदर्शित झाला होता. कलाकार महिपाल, गीतांजली, हेलन, मारूती, नलिनी चोणकर, जीवनकला, मनहर देसाई, गीतकार, इंदीवर, संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल. त्यांनी संगीत दिलेला पहिला चित्रपट हाच. निर्माता मूव्हीलॅण्ड, दिग्दर्शक बाबुभाई मिस्त्री.

भरत चंद्रकांत कालुवाला, माहिम कॉजवे, मुंबई.

□ **'मेरा जीवनसाथी बिछड गया...' हे तलतने गायलेले गाणं कोणत्या चित्रपटातील? कलाकार, गीतकार, संगीतकार, निर्माता-दिग्दर्शक कोण?**

— चित्रपट *बाबुल* (१९५०), कलाकारः दिलीपकुमार, नरगिस, मुन्वर सुलताना, अमर, ए. शाह, जानकीदास, पार्श्वगायिका उमादेवी टुनटुन हे नाव धारण करून या चित्रपटाद्वारेच सर्वात प्रथम अभिनेत्री बनली. गीतकारः शकील बदायुनी, संगीतकारः नौशाद, निर्माता-दिग्दर्शकः एस. यू. सन्नी.

रामकृष्ण तुकाराम साळवी, अकोला.

□ **'हम तुम और जहाँ, क्या नशा नशासा है...' हे रफीने गायलेले गाणे कोणत्या चित्रपटातील? कलाकार, संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक कोण?**

— हे गाणे १९५९च्या *दिल देके देखो* या चित्रपटात होते. पण या गाण्याचा मुखडा 'हम तुम और जहाँ...' असा नव्हता. 'हम और तुम और ये समाँ...' असा होता. कलाकार शम्मी कपूर, आशा पारेख, सिध्दू, मलिका, राजेंद्रनाथ, वास्ती, सुलोचना, ताहीर खान, रणधीर. संगीतकार उषा खन्ना. गीतकार मजरूह, निर्माता एस. मुखर्जी (फिल्मालय), दिग्दर्शक नासिर हुसेन.

विठ्ठल अ. पाटील, औरंगाबाद.

□ ***हलाकू* व *चांद और सूरज* हे चित्रपट कधी प्रदर्शित झाले होते? गीतकार, संगीतकार निर्माता-दिग्दर्शक कोण?**

— *हलाकू* १९५६ला प्रदर्शित झाला होता. गीतकार हसरत, शैलेंद्र. संगीतकार शंकर-जयकिशन. निर्माता पी. एन. अरोरा. (ऑल इंडिया पिक्चर्स). दिग्दर्शक डी. डी. कश्यप. *चांद और सूरज* १९६५ला प्रदर्शित झाला होता. गीतकार शैलेंद्र, संगीतकार सलील चौधरी, निर्माता-दिग्दर्शक दुलाल गुहा.

करण संजय आचार्य, वास्को गोवा.

□ **खेमचंद प्रकाशनी *महल* व *तानसेन* शिवाय अन्य कोणत्या चित्रपटाला संगीत दिले आहे?**



खेमचंद प्रकाश संगीत दिगदर्शित *महल*

— *शादी, परदेसी, जिद्दी, सावन आया रे, रिमझिम* यासारखे अनेक चित्रपट त्यांच्या संगीतामुळे गाजले. किशोरकुमार त्यांच्याच संगीतात *जिद्दी*त सर्वात प्रथम गायला.

पी. एस. म्हापसेकर, म्हापसा-गोवा.

□ **लता, उषा व मीना मंगेशकर भगिनींनी शंकर-जयकिशन यांच्या संगीतात एखादे गाणे एकत्र गायलं आहे काय?**



— १९५६च्या *पटरानी* या चित्रपटातील 'अरे कोई जाओ रे पिया को बुलावो रे...' हे गाणं लता, उषा व मीना या मंगेशकर भगिनींनी शंकर-जयकिशन यांच्या संगीतात एकत्र गायले होते.

मिलन नरेश कोळी, वरेडी, कोळीवाडा.

□ **अमिताभ व परवीन बाबी यांनी एकत्र भूमिका केलेला पहिला चित्रपट कोणता?**

— १९७४ चा *मजबूर*.

सुमन लहू कोळी, वरेडी.

□ **नलिनी जयवंत महाराष्ट्रीय आहेत का?**

— हो. त्या सीकेपी आहेत. ●